# कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ बैठक दि.०५/१०/२०१६ इतिवृत्त

| अ.क्र. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | सहविचार सभा वेळेत होणेबाबत व विविध संघटनांच्या बैठक क्रमाबाबत. | सहविचार सभांचे आयोजन वेळेत घेण्यात येतील. तथापि, वरिष्ठ कार्यालयाच्या बैठका, मा. उच्च न्यायालयीन प्रकरणे व अन्य अपरिहार्य कारणांमुळे ऐनवेळी नियोजनात बदल करावा लागतो. संघटना बैठकांची क्रमवारी दरवेळी रोटेशननुसार ठेवण्यात यावी. | शिक्षण उपसंचालक / शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| २ | विभागीय संघटना बैठकांमध्ये शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्या उपस्थितीबाबत व जिल्हास्तरावरील बैठकांबाबत. | या कार्यालयाकडून विभागीय संघटना बैठकांचे आयोजन करत असतानाच संघटना बैठकांना शिक्षणाधिकारी यांनी स्वत: उपस्थित रहाणेबाबत वेळोवेळी आदेशित करण्यात आले आहे. अपवादात्मक परिस्थितीत या कार्यालयाची पूर्व परवानगी घेवूनच अनुपस्थित राहता येईल. अशा वेळी उपस्थित प्रतिनिधीने बैठकीच्या विषयांबाबत आवश्यक माहिती द्यावी. तसेच बैठकीच्या कार्यवाहीबाबत शिक्षणाधिकारी यांनाही अवगत करावे. यापुढेही शिक्षणाधिकारी यांनी विभागीय संघटना बैठकांना स्वत: उपस्थित रहावे. तसेच शिक्षणाधिकारी यांनी शिक्षण उपसंचालक यांच्या पत्राची वाट न पाहता नियमितपणे बैठका घ्याव्यात. जिल्हास्तरावर न झालेल्या बैठका तात्काळ घेण्यात याव्यात. जिल्हास्तरावरील बैठकात प्रश्नांची निर्गती न झाल्यास असे प्रश्न विभागीय बैठकीत येतात. त्यामुळे शिक्षणाधिकारी यांनी जिल्हास्तरावरील प्रश्न जिल्हा स्तरावरच निर्गत होतील, याकडे लक्ष द्यावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | नियमित |
| ३. | आरक्षण डावलून दिलेल्या मान्यता व इंग्रजी, गणित, विज्ञान या पदभरती मान्यतेतील अनियमितेबाबत. | दि. २ मे, २०१२ नंतर दिलेल्या मान्यतेबाबत तपासणी आयुक्त शिक्षण कार्यालयात सुरू आहे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| ४. | सरळसेवा भरती व पदोन्नतीमधील अनुशेष. | शासन आदेशाप्रमाणे दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी. याबाबत शिक्षणाधिकारी यांना सूचना दिलेल्या आहेत. | शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| ५. | गंगामाई ज्युनियर कॉलेज, इचलकरंजी बाबत सहा. संचालक यांच्या चौकशी अहवालाबाबत. | सेवाजेष्ठतेबाबत तक्रार असलेने शिक्षणाधिकारी हे सक्षम अधिकारी असल्याने त्यांनी सुनावणी घेवून निर्णय द्यावा. | शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| ६. | सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक दि.१८ मे, २०१३ यावरील कार्यवाही. | सदर परिपत्रकातील सुचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत शिक्षणाधिकारी यांना कळविण्यात आले आहे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | सेवाजेष्ठता यादीबाबत (शिक्षण समिती, खंडाळा). | जिल्हास्तरावर सर्व संस्थांना सेवाजेष्ठता यादी अद्ययावत करणेबाबत परिपत्रक निर्गमित करावे. दि.१ जानेवारी सेवाजेष्ठता यादी होणे आवश्यक आहे. तसेच सेवाजेष्ठता यादी वर संस्था सचिवांची स्वाक्षरी असावी. सेवाजेष्ठता यादी निदर्शनास आणलेबद्दल सर्व कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी घ्यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| ८. | मागासवर्गीयांचे प्रश्न तात्काळ सोडविणेबाबत. | | | |
| ९. | वैयक्तिक प्रकरणे (माध्य. विद्यालय, चेंदवण ता. कुडाळ व श्री. तुषार शिर्के, वेंगुर्ला हाय. यांचे यांचे पगाराबाबत). | शिक्षणाधिकारी यांनी वैयक्तिक प्रकरणे तात्काळ निर्गत करावीत. संघटना स्तरावरून वारंवार विचारले जाणारे वैयक्तिक प्रश्न सोडविण्यास प्राधान्य द्यावे. बैठकीत चर्चा झालेनुसार वैयक्तिक प्रकरणांवर त्वरित कार्यवाही करण्यात यावी. तेच तेच वैयक्तिक प्रश्न बैठकीत विचारले जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | तात्काळ |

**शिक्षण उपसंचालक,**
**कोल्हापूर विभाग कोल्हापूर**